**<u>सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात</u>**

नि.फौ.ख.क्र. ३५/२०१८.
निशाणी क्र.६५
शासन वि विशाल

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ ची जबानी</u>**

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की</u>,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | गालीबखॉ हमीदखॉ पठाण |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | सेवानिवृत्त |
| राहणार | – | बिलाल नगर, धाराशिव, ता. जि. धाराशि |

**<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.एस. व्ही. बादुले साहेब यांचे मार्फत</u> –**

मी दिनांक ०३, जानेवारी २०१८ रोजी पोलिस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी अनाळा– परंडा बसवर दगडफेक केली होती. त्या संदर्भात तक्रार एस. टी. ड्रायव्हरने पो. ठाणेत दिली होती. तक्रार झालेनंतर तपास माझेकडे देण्यात आला. सोबत माझ्याकडे फिर्याद व एफआयआर देणेत आली. मी फिर्याद वाचली. तपासा दरम्यान मी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला, त्यावर पंचांच्या तसेच माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६६** देणेत येते. मी घटनास्थळ पंचनामा करतेवेळेस फोटो काढलेले आहेत. घटनास्थळावरुन दगड व काचेचे तुकडे जप्त केले होते. साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे तपास टिपण नोंदवले. आरोपींना अटक केली. तपासाअंती तीन आरोपींनी एस. टी बसवर दगडफेक करुन नुकसान केल्याचे दिसुन येते. आरोपींनी भिमा कोरेगांव येथील घटनेच्या निषेधार्थ बंदमुळे एस. टी. बसवर दगडफेक केली. त्यादिवशी अनाळा गाव बंद होते. त्यामध्ये आरोपी विशाल, नाना सरवदे व विधीसंघर्षग्रस्त बालक हे होते. मी त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी

न्यायालयात हजर नाहीत. मी एस. टी. बसचे काचचे तुकडे व दगड पाहिल्यास ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.20 17:13:01 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२०.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.

**<u>सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात</u>**

नि.फौ.ख.क्र. ३५/२०१८.

निशाणी क्र.६४

शासन वि विशाल

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची जबानी</u>**

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की</u>,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | गणेश प्रकाश बुलबुले |
| वय | – | ३८ वर्षे, |
| व्यवसाय | – | कंडक्टर, परंडा एस.टी. महामंडळ |
| राहणार | – | नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर. |

**<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.एस. व्ही. बादुले साहेब यांचे मार्फत</u> –**

मी १४ वर्षांपुर्वीपासुन वाहक म्हणुन काम करतो. माझा बॅच नं.१२९२८३ असा आहे. मी हनुमंत वाकडे यांना ओळखतो. ते परंडा येथील डेपोमध्ये चालक म्हणुन कार्यरत आहे. घटना दिनांक ०३, जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११.१५ वाजता अनाळा येथील चौकापासुन परंडा रोडवर घडली. त्यादिवशी मी व माझे सहकारी चालक हनुमंत वाकडे बॅच नं. ५६३० धाराशिव ते खर्डा एस.टी ने चाललो होतो. त्या बसचा क्रमांमक एम. एच. २०–बी–९८९२ असा होता. त्यादिवशी आम्ही परंडाहुन दांडेगांवला गेलो. दांडेगावहुन परंडा येथे गेलो असता ११.१५ वाजता अनाळा चौकाचा पुढे आलो असता तीन मुले दगड घेवुन आले व बसचे समोरुन मोठी काच फोडली. त्यादिवशी अनाळा चौकात बंदोबस्त होता. तो बंद भिमा कोरेगाव येथील हिंसाचारामुळे पाळला होता. दगडफेक झाले तेव्हा पोलिसांनी व लोकांनी पाहिले. ते तेथे आले. पोलिसांनी मुलांना पकडले व अंबी पो. स्टेशन येथे घेवुन गेले. काच फोडल्यामुळे एस. टीचे वीस हजार रुपये नुकसान झाले होते. ती मुले विकास सरवदे, रणजित शिंदेव नाना सरवदे हे होते. मी त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाहीत. मी एस. टी. बसचे

काचेचे तुकडे पाहिल्यास ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी  व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.20 17:24:06 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२०.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.